ठाणे महानगरपालिका,

वृक्षप्राधिकरण

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८ (३) अन्वये

## जाहीर सूचना

ज्याअर्थी, मे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांच्या मंजुर विकास आराखडयानुसार अर्जदार मे. रिलायन्स अस्ताल्डी जॉईन्ट वेन्चर यांनी सादर केलेल्या अर्जानुसार कापुरबावडी ते मानपाडा ते डोंगरीपाडा ते विजय गार्डन ते कासारवडवली, पर्यंतच्या मुंबई मेट्रो पॅकेज लाईन - ४ च्या बांधकामात बाधित वृक्ष तोडणे / पुनर्रोपण करणेकरीता वृक्षप्राधिकरणाकडे सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, अर्जदार यांनी विकासकामा अंतर्गत मंजुर नकाशे / आराखडे यामधील नियोजित मुंबई मेट्रो पॅकेज लाईन - ४ च्या बांधकामात बाधित होणा-या वृक्षांपैकी जे वृक्ष तांत्रिकदृष्टया पुनर्रोपण करणे शक्य असणारे वृक्ष पुनर्रोपण करणे व तांत्रिकदृष्टया पुनर्रोपण करण्यास अशक्य असणारे वृक्ष तोडणे याकरीता वर नमूद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये वृक्षप्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर केला आहे.

ज्याअर्थी, वृक्षप्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ दिवस कालावधीमध्ये हरकती तथा सुचना मागविण्याचे सुचित केले आहे.

त्याअनुषंगाने वर नमूद अर्जदार यांनी सादर केल्यानुसार विकास प्रस्ताव अंतर्गत बाधित ४३५ वृक्ष पुनर्रोपण करणे व २३ वृक्ष तोडणे या अर्जाच्या अनुषंगाने तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. ११९/२०१७ च्या अंतरिम आदेशातील अटी व शर्तीस अधीन राहून सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी हरकती तथा सूचना असल्यास लेखी स्वरुपात ठाणे महानगरपालिका नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, प्रशासकीय भवन, डॉ.अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे (प.) येथे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती तथा सूचनां ग्राहय राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(डॉ. अनुराधा बाबर)<br>
सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे.